



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते.
सर्जनशीलतेने तुमच्यात प्रगल्भ विचार येतात.
विचाराने ज्ञान वाढते,
आणि ज्ञानाने माणूस महान बनतो.
– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम


वर्ष : ०५ | अंक : ५५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०९ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन

### पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उदघाटन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या भव्य नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज पार पडलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी आपल्या भाषणात लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव घेतलं. अतिशय भव्यदिव्य असा आजचा विमानतळ उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. पण सकाळपासून लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव घेण्यात आलेलं बघायला मिळालं नव्हतं. उद्घाटनाच्या कार्यक्रमावेळी भाषण करताना सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. बा. पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील दि. बा. पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव दिलं जावं, अशी इथल्या स्थानिक भूमिपुत्रांची मागणी आहे. त्यांच्या या मागणीनुसार अनेक घडामोडी घडल्या आहेत. स्थानिकांनी यासाठी आंदोलन देखील केलं होतं. या सर्व घडामोडींनंतर दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव केंद्रात पाठवण्यात आला आहे. तिथे प्रस्ताव मान्य झाल्यानंतर विमानतळाला नाव देण्यात येणार आहे. या सगळ्या घडामोडींदरम्यान आज विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पार पडलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठोपाठ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील आपल्या भाषणात दि. बा. पाटील यांचा उल्लेख केला.

**नरेंद्र मोदी दि. बा. पाटील यांच्याबद्दल नेमकं काय म्हणाले?**

आज या मोठ्या क्षणी महाराष्ट्राचे सपुत लोकनेता दि. बा. पाटील यांच्या देखील स्मृतींना उजाळा देतो. त्यांनी समाज, शेतकऱ्यांसाठी ज्या सेवाभावाने काम केलं ते आमच्या सर्वांसाठी एक प्रेरणा आहे. त्यांचं जीवन समाज जीवनात काम करणाऱ्यांना नेहमी प्रेरित करतं, असं नरेंद्र मोदी लोकनेते दि. बा. पाटील यांच्याबद्दल म्हणाले.

नरेंद्र मोदी यांनी मराठीतून आपल्या भाषणाला सुरुवात केली. विजयादशमी झाली. कोजागिरी पौर्णिमा सुद्धा झाली. आता दहा दिवसांनी दिवाळी. तुम्हाला या सर्वांसाठी खूप खूप शुभेच्छा देतो, असं नरेंद्र मोदी आपल्या भाषणात म्हणाले. आज मुंबईची मोठी प्रतिक्षा संपली आहे. मुंबईला आपला दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळाला आहे.



हे विमानतळ या क्षेत्राला आशियाच्या सर्वात मोठ्या कनेक्टिविटी हबच्या रुपाने स्थापन करण्यासाठी खूप मोठी भूमिका निभावणार आहे, असा दावा नरेंद्र मोदी यांनी केला.

आज मुंबईला पूर्णपणे अंडरग्राउंड मेट्रो मिळाली आहे. यामुळे मुंबईत प्रवास करणं आणकी सोपं होईल. लोकांचा वेळ वाचेल. ही अंडग्राऊंड मेट्रो विकसित भारताचं जिवंत प्रतिक आहे. मुंबई सारख्या व्यस्त शहरात जमिनीच्या खाली ही शानदार मेट्रो बनवण्यात आली आहे. मी या प्रकल्पाशी जोडले गेलेल्या प्रत्येकांचं अभिनंदन करतो, असं मोदी म्हणाले. ही वेळ भारताच्या तरुणांसाठी अगणित संधीची वेळ आहे. काही दिवसांपूर्वी देशाच्या अनेक आयटीआयला इंडस्ट्रीजसोबत जोडण्यासाठी ६० हजार कोटींची पीएम सेतू स्किम लाँच झाली आहे. आजपासून महाराष्ट्र सरकारने शेकडो आयटीआय शाळांमध्ये नव्या प्रोग्रॅमची सुरुवात केली आहे. त्यामध्ये ड्रोन, रोबोटिक्स, इलेक्ट्रिक गाड्या, सोलार एनर्जी, ग्रीन हायड्रोजन अशा अनेक टेक्नोलॉजींना टायमिंग मिळेल. मी महाराष्ट्राच्या तरुणांना खूप खूप शुभेच्छा देतो, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

आज पूर्ण देश विकसित भारताच्या संकल्पात जोडला गेला आहे. विकसित भारत म्हणजे गती आणि प्रगती असेल. जिथे लोकहित सर्वोपरि असेल. जिथे सरकारची योजना देशवासियांचं आयुष्य सोपं बनवेल, असंदेखील नरेंद्र मोदी म्हणाले.

## निफाडमध्ये गोळीबार प्रकरणातील आरोपी जेरबंद!

### स्थानिक गुन्हे शाखा व निफाड पोलिसांची संयुक्त कारवाई



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.८, विंचूर (नाशिक) :** निफाड पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या गोळीबार व जिवघेणा हल्ला प्रकरणातील फरार आरोपींना निफाड पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुद्देमालासह अटक करण्यात यश मिळवले आहे.

दि.३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास जळगाव फाटा येथील आसिफ किराणा दुकानासमोर सिद्धार्थ मनोहर साळवे (वय २७, रा. सुंदरपूर, ता. निफाड) याच्यावर जुन्या वैमनस्यातून गोळीबार करण्यात आला होता. गावठी पिस्तूलातून झाडलेल्या तीन गोळ्या त्याच्या अंगावरून गेल्या असून, कमरेजवळील बरगडी व खांद्याला दुखापत झाली होती. या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२६/२०२५ भा.दं.वि. कलम १०९, ३५१(२), ३५२, ६१(२), ३(५) व शस्त्र कायद्यांतर्गत नोंदवण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांनी तातडीने आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. रविंद्र मगर व निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपींचा मागोवा घेत अखेर सहा आरोपींना अटक केली. त्यात मयुर राजेंद्र ढगे (रा. बेघरबस्ती, निफाड), विजय महेश शिंदे (रा. मटण मार्केटसमोर, निफाड), विशाल आशोक केंदळे (रा. आगस्तीनगर, निफाड), पृथ्वीराज जाधव (रा. काथरगाव), आयुष संतोष भावसार (रा. शंकरनगर, निफाड), सिद्धार्थ राजु साळवे (रा. जळगाव, निफाड) यांचा समावेश आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या देखरेखीखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखा व निफाड पोलीस ठाण्याच्या एकत्रित प्रयत्नातून गुन्ह्यातील आरोपींना जेरबंद करून प्रकरण उघडकीस आणण्यात आले आहे.

**▶आरोपींकडून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे**

घटनास्थळावर सापडलेली एक गोळी (सस्पेक्टेड बुलेट), रेडमी, वन प्लस, टेक्नो आदी कंपन्यांचे एकूण चार मोबाईल, एक १६ जी बी क्षमतेचा पेनड्राईव्ह ज्यात आरोपींचे फोटो व कॉल रेकॉर्डिंग आढळले.

## ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा.आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत १२२, से-०४, ऐरोली, नवी मुंबई येथे चिदानंद शिवप्पा शिंदगी यांनी अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आली होती. तद्नंतर संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरचे अनधिकृत बांधकाम सुनिल काठोळे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन निष्कासित करण्यात आले.

सदर धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, मजूर, ब्रेकर-, गॅसकटर-, तसेच अतिक्रमण विभागाचे पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## बल्लारपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदी ओबीसी महिलेला संधी !




**•पालिकेच्या इतिहासात तब्बल १२ वेळा प्रशासकाची राजवट**

**•२६ नगराध्यक्षांपैकी केवळ ४ नगराध्यक्ष भाजपाचे**

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, बल्लारपूर (चंद्रपूर) :** चंद्रपूर जिल्ह्यात सर्वात मोठी नगरपालिका बल्लारपूर आहे. ही नगरपालिका सन १९५२ ला अस्तित्वात आली. तेव्हापासून या नगरपालिकेचा कारभार २६ नगराध्यक्षांनी सांभाळला. यापैकी केवळ ४ नगराध्यक्ष भाजपाचे झाले. येथे प्रशासकीय राजवट १२ अधिकाऱ्यांनी गाजवल्याचा इतिहासात नमुद आहे. आगामी नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक साठी सोमवारी नगराध्यक्ष पदाची सोडत जाहीर झाली. आता बल्लारपूर नगरपालिकेच्या अध्यक्ष म्हणून नागरिकांचा मागास प्रवर्ग ( ओबीसी ) महिलेला संधी मिळाली आहे. यामुळे राजकीय समीकरण जुळविण्यासाठी हालचाल सुरु झाली आहे. बल्लारपूर नगरपालिकेच्या इतिहासात आजतागायत २६ नगराध्यक्षांनी कारभार केला आहे. यामध्ये सर्वाधिक नगराध्यक्ष कांग्रेसचे झाले आहे. केवळ ४ वेळा भाजपाचे नगराध्यक्ष झाले आहे. विशेष म्हणजे येथील नगरपालिकेत तब्बल १२ अधिकाऱ्यांनी प्रशासकाची जबाबदारी सांभाळली आहे.

**आगामी नगरपालिका निवडणुकीत राहणार ३४ नगरसेवक !**

आगामी नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक दरम्यान १७ प्रभागातून प्रत्येकी दोन नगरसेवक मतदार निवडणार आहेत. दि. ०७ ऑक्टोबर रोज मंगळवार ला नगरसेवक पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. प्रभाग क्रमांक १ मध्ये अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण असे आरक्षण आहे. प्रभाग क्रमांक २ मध्ये अनुसूचित जाती व ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक ३ मध्ये अनुसूचित जाती व ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक ४ मध्ये ओबीसी महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५ मध्ये ओबीसी व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ६ मध्ये ओबीसी महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ मध्ये अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ मध्ये अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ मध्ये ओबीसी व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १० मध्ये अनुसूचित जाती व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ११ मध्ये अनुसूचित जाती महिला व ओबीसी, प्रभाग क्रमांक १२ मध्ये अनुसूचित जाती व ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक १३ मध्ये अनुसूचित जमाती व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १४ मध्ये अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १५ मध्ये ओबीसी व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १६ मध्ये अनुसूचित जाती व सर्वसाधारण महिला, तर प्रभाग क्रमांक १७ मध्ये अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण असे नगरसेवकांचे आरक्षण आहे.

## शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा - ॲड. निलेश हेलोंडे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, बुलडाणा :** केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी दिले.

ते बुधवारी सिंदखेड राजा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे नुकसान व मदतीसंदर्भात आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

ॲड. निलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील शेती पद्धतीचा आढावा घेतांना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीकांबरोबर चिया, रेशीम,



चारा लागवडीला प्राधान्य देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. चिया, रेशीम लागवडीसाठी शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी महत्त्वाची भूमिका घ्यायला पाहिजे. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

कृषी विभागाने शासनाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी. योजनांची अंमलबजावणी गतीने झाली पाहिजे. तालुक्यात प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी, चारा लागवडीचे प्रमाण वाढवावे, रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करावे. उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना कर्ज पुरवठा झाला पाहिजे. शाश्वत बाजारपेठ, गोदाम उपलब्ध करुन द्यावे.

शेतकऱ्यांच्या बांधावर प्रयोगशाळा सुरु कराव्यात, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शेतकरी सक्षम झाला पाहिजे. ही माझी भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, पोलीस निरीक्षक अमोल इंगळे, भास्कर घुगे, महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी जीवन राठोड आदी उपस्थित होते.

# संपादकीय



## भारतीय वायू दल !



आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्काड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्काड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसामग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली.

भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# 'आखाता'तील संघर्षाची दोन वर्ष

सरकारच्या हाती गरिबांच्या आयुष्यात 'आनंदाचा शिधा' नावाची छोटीशी, पण हृदयाला दिलासा देणारी मूठ होती. नावातच आपुलकी होती. जणू तांदळाच्या पोत्यात सरकार स्वतःचा हात पुढे करून म्हणतंय, घे, हे तुझं हक्काचं आहे. हा शिधा केवळ मोफत गहू-तांदूळ नव्हता. तो होता एक भावनिक आधार, गरिबांच्या ओंजळीतला आशेचा ठेवा. आणि आज तो सरकारने शांतपणे काढून घेतला. कुठेही गाजावाजा नाही, कोणताही जाहीरनामा नाही.

शिधा म्हणजे केवळ मोफत आतांदळ-गह नव्हे. ती होती एक सामाजिक बांधिलकीची खूण. आणि ही खूण आता सरकारने गुपचूप पुसून टाकलीय. एका सरकारी बैठकीत आनंदाला उठवून लावण्यात आलं. आणि ही बातमी आलीही अशी, जणू काही तांदळाचं भाव थोडंसं वाढल्यागत. मूलभूत गरजांमध्ये अन्नावरचा हक फार प्राथमिक असतो. आणि तो सरकारने दिला तर तो केवळ दयेचा डाव नव्हे, तर तो एक मानवी अधिकारच मानला जातो. पण आजच्या निर्णयात ना तसा अधिकार, ना तशी संवेदनशीलता. कोणत्याही निवेदनात, मंत्र्याच्या वक्तव्यात किंवा सरकारी संकेतस्थळावर 'आनंदाचा शिधा बंद करतोय' असं जाहीर केलं नाही. पण रेशन दुकानांच्या रांगेत उभ्या असलेल्या बाईला, तिच्या शेजारच्या वयोवृद्ध गृहस्थाल, किंवा नुकत्याच लग्न झालेल्या कुटुंबाला आता हे समजतंय की, सरकारचा 'आनंद' संपलाय.

आनंदाचा शिधा ही योजना केवळ अन्नधान्य पुरवणारी नव्हती. ती होती एक संकेत. गरीब कुटुंबाच्या आयुष्यात सरकारचा एक हात पोहोचतोय, ही भावना त्या पिशवीतून घरात उतरायची. खऱ्या अर्थानं, तो 'आनंद' होता गरिबांसाठी. कारण ज्यांच्या अंगणात रोजच्या जेवणाचा प्रश्न असतो, त्यांच्यासाठी मोफत किंवा सवलतीच्या दरातला शिधा म्हणजे आश्वासक भविष्याचं छोटं पाऊल. आणि हे पाऊल आता मागे घेतलं गेलंय. या निर्णयामागे तर्क आहेत. खर्च वाढतोय. केंद्र सरकारने अन्नसुरक्षा कायद्यानुसार दिलेलं मोफत धान्य मिळतंय, राज्याचा निधी कमी आहे, इत्यादी. हे सारे व्यवस्थापन' प्रकारातले मुद्दे, पण प्रश्न व्यवस्थेचा नाही, तो दृष्टिकोनाचा आहे. एकीकडे शाश्वत विकास म्हणत सरकार पायाभूत सुविधा वाढवतंय, ग्रीन हायवे, मेट्रो, नवीन विमानतळ उभारतोय. आणि दुसरीकडे, ज्यांना दोन वेळचं जेवण देणं हा सरकारचा आद्य कर्तव्याचा भाग होता, त्यांच्याकडून आनंदाचा हक्क काढून घेतलाय. गरिबांसाठी असलेल्या योजना हळूहळू बंद करायच्या. आणि त्यावरच 'सबका साथ, सबका विकास' असं लिहायचं, हे आपल्या राजकीय व्यवस्थेचं एक नविन झालंय. नावात समीकरण योजनांच्या 'आनंद' असतो, पण अंमलबजावणीत तो हरवतो. मग तो पाणी फाऊंडेशनचा उपक्रम असो, की अन्य योजना, की आनंदाचा शिधा. काही काळ गाजतात, प्रचारात येतात आणि मग शांतपणे विस्मृतीत जातात. कोणताही अधिकारी, मंत्री, किंवा योजना संकल्पक याची जबाबदारी घेत मोठी पोकळी आहे. योजनांचं मूल्य केवळ आकडेवारीत मोजता येत नाही. ते मोजता येतं आयुष्यांमध्ये, त्यांच्यात घडणाऱ्या बदलांमध्ये. आनंदाचा शिया ही अशा बदल घडवणारी योजना होती. रेशनच्या पोत्यात मिळणाऱ्या त्या दोन-चार गोष्टी केवळ

वस्तू नव्हत्या, त्या आशेच्या खुणा होत्या. त्या बंद झाल्याचं दुःख केवळ उपासमारीचं नाही, तर दुर्लक्षित केलं गेल्याचंही आहे. आनंदाचा शिधा हा एकप्रकारे गरिबांच्या चेहऱ्यावरचा हसू देणारा लहानसा गोड मोती होता. एक कुटुंब त्यातला काही भाग मिळवून, जोपर्यंत मिळवलेलं असतं, तोपर्यंत आशेच्या दृषटिकोनातून जगत असायचं. त्यातील काहीतरी त्यांच्या पोटात जातं, आणि काहीतरी त्यांच्या मनात आशा निर्माण करतं. 'आनंद' केवळ शिधात नाही, तर त्या प्रत्येक गोष्टीत सामावलेला होता. सरकारने त्याला रह करत, केवळ आर्थिक विचार केला. पण त्यात तो सर्वांचा जीवनाचा काहीतरी भाग हरवला आहे. गरिबांवरची ही उधळलेली हलकीची ताणतणाव, कुटुंबाच्या



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

आशेच्या लहानशा किडकिडीत सूक्ष्मांकांचं हरवणं हे त्यांनाही समजतंय. हा निर्णय निवडणुकीच्या तोंडावर घेतलेला नाही, हे खरं. पण यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते, गरिबांचा आवाज हो मतपेटीवर परिणाम करणारी गोष्ट उरलेली नाही. कारण गरिबांचं मत सुरक्षित आहे किंवा अप्रभावी. म्हणूनच त्यांच्या शिध्यावर गदगदीत सरकारचा पहिला घाव बसतो. या पार्श्वभूमीवर, 'आर्थिक जबाबदारी 'चा दाखला देत जर सरकार गरीबांचा शिधा कमी करत असेल, तर ती केवळ बचत नव्हे, तर बेदिली आहे.

गरिबीची संकल्पना आज फक्त आकड्यांमध्ये सापडते. पण ती रोज जगणं असते. एका दिवसाचं तांदूळ, चार दिवसांची डाळ, आणि महागाईच्या काट्यावर जमवलेली कुटुंबाची गणितं. आनंदाचा शिधा हा त्या गणितांचा एक छोटासा स्थिरांक होता. आता तो गेला. सरकारने काहीतरी कमी केलं आहे, हे गरीबांच्या ऑंजळीतून निसटलेलं दिसतं. पण सरकारला वाटतं, त्यांनी केवळ शिधा थांबवला आहे. खरंतर त्यांनी 'आनंद' हरवला आहे, गरिबांच्या आयुष्यातील 'आनंद' म्हणजे केवळ पोटभर अन्न नव्हे, तर त्या अन्नातून निर्माण होणारी सुरक्षिततेची भावना. आज शिधा थांबवून सरकारने त्यांचा उद्याचा आत्मविश्वास कमी केला आहे. उद्या सकाळी घरात काय शिजवायचं, हा प्रश्न पुन्हा कुटुंबाच्या डोक्यावर कोसळतोय. हे केवळ भुकेचं संकट नाही, तर मानवी सन्मानाचं अपमान आहे. कारण गरीबाला मिळणारा प्रत्येक कण हा केवळ भाकर नव्हे, तर जगण्याची खात्री असते. ती खात्री सरकारने हिरावून घेतली, याचं राजकारणात मोजमाप होणार नाही. पण समाजाच्या रगांमधून हळूहळू उसळणारा असंतोष, हीच खरी किंमत ठरणार आहे. शासनाने हरवलेला हा 'आनंद' पुन्हा उगवण्यासाठी आता प्रश्न केवळ सरकारचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे.

# भावनिक नात्याचं प्रतिक : करवा चौथ


- प्रविण बागडे
नागपूर
मो.९९२३६२०९१९

'करवा' म्हणजे मातीचा कलश किंवा भांडे आणि 'चौथ' म्हणजे चतुर्थी. कार्तिक महिन्यातील कृष्णपक्षाची चतुर्थी या दिवशी 'करवा चौथ' साजरा केला जातो. या दिवशी विवाहित स्त्रिया सूर्योदयापासून ते चंद्रदर्शनापर्यंत उपवास धरून पतीच्या दीर्घायुष्याची व सुखी वैवाहिक जीवनाची प्रार्थना करतात. भारत हा सण-उत्सवांचा देश आहे. प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या प्रथा-परंपरा येथे जपल्या जातात. त्यातही स्त्रीच्या सौभाग्यासाठी व पतीच्या दीर्घायुष्यासाठी साजरा होणारा 'करवा चौथ हा व्रतप्रधान सण विशेष महत्त्वाचा मानला जातो. उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश या भागात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आता त्याचा प्रभाव महाराष्ट्रासह इतर राज्यांतही दिसून येतो. करवा चौथ ही केवळ धार्मिक परंपरा नसून पती-पत्नीतील भावनिक नात्याचे प्रतीक आहे. या सणामुळे स्त्रियांच्या आयुष्यात श्रद्धा, संयम व कुटुंबाबद्दलची निष्ठा दृढ होते. स्त्रियांची सजावट, मेहंदी, नृत्य, गाणी या माध्यमातून आनंद व उत्साह निर्माण होतो. आजच्या काळात नवरा-बायको दोघेही एकमेकांसाठी उपवास करतात ही एक नवी सकारात्मक परंपरा उदयाला येत असुन या सणाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक काळातील बदल म्हणजे पूर्वी करवा चौथ हा सण फक्त पारंपरिक पद्धतीने ग्रामीण व शहरी घरांमध्ये साजरा होत असे. आता मात्र चित्रपट, मालिका, सोशल मीडियाच्या प्रभावामुळे या सणाची लोकप्रियता संपूर्ण देशभर वाढली आहे. शहरी भागात महिलांसाठी खास करवा चौथ समारंभ, फॅशन शो, मेहंदी स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. करवा चौथ हा सण स्त्रीच्या श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाचा प्रतीक आहे. पतीच्या दीर्घायुष्यासाठी स्त्रिया करीत असलेले हे व्रत केवळ धार्मिक नसून कौटुंबिक ऐक्य व वैवाहिक जीवनातील बंध दृढ करणारा आहे. बदलत्या काळानुसार या सणाच्या पद्धतीत फेरबदल झाले असले तरी त्यामागचा मुख्य उद्देश आजही तितकाच जिवंत आहे, पती-पत्नीतील प्रेम आणि कुटुंबाचे सुख-समाधान.

करवा चौथशी निगडित अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक कथा सती सावित्रीची आहे. सावित्रीने आपल्या तपश्चर्येने मृत्यूदेव यमराजालाही पती सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागले होते. त्यामुळे या व्रताचा संबंध पतीच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. दुसरी कथा पांडवांच्या काळाशी निगडित आहे. म्हणे, द्रौपदीनेही पती अर्जुनाच्या कल्याणासाठी करवा चौथचे व्रत केले होते. त्यामुळे पतीच्या सुरक्षिततेसाठी व सौख्यासाठी हे व्रत स्त्रिया आचरणात आणतात. करवा चौथ व्रताची पद्धत म्हणजे सकाळची सुरुवात विवाहित स्त्री सूर्योदयापूर्वी 'सर्गी'नावाचे भोजन करते. हे भोजन प्रामुख्याने सासरच्या मंडळींकडून दिले जाते. तसेच, दिवसभर अन्न व पाणी न घेता उपवास केला जातो. दिवसभर स्त्रिया सजतात, मेहंदी लावतात, नटतात. संध्याकाळचा पूजाविधीच्या वेळी करव्यामध्ये पाणी, धान्य भरले जाते. सखी-सोबती स्त्रिया एकत्र बसून पूजा करतात व आख्यायिका ऐकतात आणि शेवटी चंद्रदर्शन रात्री चंद्र उगवल्यावर त्याला चलणी अथवा जाळीदार वस्त्रातून पाहिले जाते. त्यानंतर पतीला त्याच चलणीतून पाहून पतीच्या हातून पाणी व अन्न घेऊन उपवास सोडला जातो.

करवा चौथ म्हटले की डोळ्यासमोर येते ते सुहागिन बायका, चंद्राला चलनीतून पाहणारी दृश्ये आणि पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना. पण आजच्या आधुनिक काळात हा सण फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित राहिलेला नाही. आता तरुण प्रेमिके-प्रेमिकाही करवा चौथ साजरा करून आपल्या नात्यातील बंध अधिक घट्ट करतात. प्रेमिकांसाठी करवा चौथ म्हणजे प्रेमाचे व्रत. दिवसभर न खाता-पिता एकमेकांसाठी उपवास करणे ही केवळ परंपरा नाही, तर एकमेकांसाठी असलेली काळजी आणि निष्ठा व्यक्त करण्याचा सुंदर मार्ग आहे. मुलगी आपल्या प्रियकराच्या यशासाठी, तर मुलगा आपल्या प्रेयसीच्या सुखासाठी प्रार्थना करतो. आज सोशल मीडियाच्या युगात जोडपी हा दिवस खास बनवतात. गिफ्ट्स देऊन, चंद्र पाहून एकत्र व्रत सोडून आणि आयुष्यभर एकमेकांसोबत राहण्याच्या वचनांनी. करवा चौथ प्रेमिकांसाठी केवळ धार्मिक विधी नसून, तो प्रेम, विश्वास आणि एकत्रित आयुष्याची आशा जपणारा सण बनला आहे. काही पारंपरिक विचारांचे लोक याकडे वेगळ्या नजरेने पाहतात, कारण करवा चौथ मूळतः वैवाहिक बंधनासाठी होता. मात्र बदलत्या काळात हा सण नात्यांमध्ये विश्वास, समर्पण आणि प्रेम वाढवणारा म्हणून तरुण पिढीत वेगळ्या अंगाने स्वीकारला जातो. आजच्या पिढीसाठी करवा चौथ हा फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित न राहता प्रेमिक-प्रेमिकांच्या नात्यातील भावनिक जवळीक वाढवणारा सण ठरत आहे. प्रेमात असलेली जोडपी हा दिवस आपापल्या पद्धतीने साजरा करून नात्यातील प्रेम, आदर आणि बांधिलकी अधिक दृढ करतात.

एकेकाळी एका नवविवाहित महिलेने आपल्या माहेरी असतांना हे व्रत केले. ती सुस्वरूप अशी युवती होती. तिने कठोरपणे आपला उपवास पालन केला. तिच्या तपाने तिला दीर्घायुष्य मिळाले. भावांनी जवळच्या डोंगरावर अग्नी प्रज्वलित केला आणि तिला सांगितले की चंद्र उगवला आहे. व्रताची समाप्ती करताना चंद्राचे दर्शन घेण्यासाठी ती तिथे गेली पण तिला लक्षात आले की भावांनी आपल्याला फसविले आहे. तिचे व्रत मोडल्याने तिच्या पतीच्या निधनाची बातमी तिला समजली. ती बातमी कळताच ती आपल्या पतीच्या घरी निघाली. वाटेत तिला शिव पार्वती भेटले आणि त्यांनी तिला असे का घडले असावे हे कथन केले. पार्वतीने तिला आपल्या करंगळीच्या टोकातून थोडे रक्त दिले आणि आपल्या पतीच्या मुखावर शिंपडण्यास सांगितले. भविष्यकाळात तिने अगदी कठोरपणे हे व्रत पाळण्याचा सल्लाही देवीने तिला दिला. सासरी पोहोचल्यावर तिने पार्वतीने दिलेले रक्त पतीच्या मुखावर शिंपडले आणि तो पुनरूज्जीवित झाला. त्यानंतर या महिलेने निष्ठेने करवा चौथ व्रत पालन केले आणि तिला सुख समृद्धी प्राप्त झाली अशी या व्रताम



ागील आख्यायिका आहे.

करवा चौथ हे हिंदू व्रत आहे. हे व्रत दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या प्रांतात केले जाते. आश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी पूर्ण दिवस उपवास करतात. संध्याकाळी चंद्र उगवल्यावर चाळणीतून प्रथम चंद्राचे दर्शन व नंतर पतीचा चेहरा पाहतात. क्वचित अविवाहित स्त्रियाही आपल्या इच्छित पतीसाठी हे व्रत करतात. सनातन धर्माच्या लोकांसाठी करवा चौथ व्रताचे विशेष महत्त्व आहे. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीधार्युष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी हे व्रत करतात. तथापि हा उपवास खूप कठीण आहे, कारण या उपवासात अन्नाबरोबरच पाणी पिण्यासही मनाई आहे, म्हणजेच हा निर्जल उपवास ठेवण्याचा नियम आहे. संध्याकाळी चंद्र देवाला जल अर्पण केल्यावरच हे वत मोडले जाते. करवा चौथ व्रताचे अनेक महत्त्वाचे नियम आहेत, त्यांचे पालन न केल्यास स्त्रियांना त्यांच्या पूजेचे पूर्ण फळ मिळत नाही.

यादिवशी गणपती आणि करवा देवी व्यतिरिक्त चंद्र देवाची पूजा करणे देखील महत्त्वाचे आहे. चंद्र देव हे वय, सुख, समृद्धी आणि शांतीसाठी जबाबदार ग्रह मानला जातो. करवा चौथच्या दिवशी चंद्र देवाची पूजा केल्याने वैवाहिक जीवन सुखी राहते. याशिवाय पतीचे वय वाढण्याची शक्यता ही वाढते. देशातील अनेक राज्यांमध्ये करवा चौथ चा उपवास करक चतुर्थी व्रत म्हणूनही ओळखला जातो, करवा चौथ व्रताचे महत्वाचे नियम करवा चौथ उपवास सूर्योदयापूर्वी सुरू होतो आणि चंद्र उगवल्यानंतर समाप्त होतो. चंद्र देवाचे दर्शन घेऊनच हे व्रत मोडावे. वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी शिव परिवाराची पूजा करताना स्त्रीचे तोंड पूर्वेकडे असावे. या दिशेला तोंड करून पूजा करणे शुभ असते.

पारंपरिकदृष्ट्या करवा चौथ हा सण विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्याच्या कामनेसाठी साजरा करतात. परंतु आधुनिक काळात, विशेषतः तरुणाईमध्ये, हा सण प्रेमिक-प्रेमिकांमध्ये देखील लोकप्रिय होत आहे. पूर्वी करवा चौथ हा फक्त सौभाग्यवती स्त्रियांचा सण मानला जात असे. पण आता प्रेमात असलेल्या जोडपीदेखील एकमेकांप्रती निष्ठा, प्रेम आणि बांधिलकी दाखवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. या दिवशी अनेक तरुणी आपल्या बॉयफ्रेंडसाठी दिवसभर उपवास धरतात आणि त्याच्यासाठी सुख-समृद्धी व यशाची प्रार्थना करतात. तसेच, काही वेळा तरुण मुलंही आपल्या प्रेयसीसाठी उपवास करतात, जेणेकरून नात्यात समानतेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश जाईल.

आजकाल सोशल मीडियाच्या प्रभावामुळे करवा चौथ इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअॅपवर प्रेमिके-प्रेमिके करवा चौथच्या शुभेच्छा देतात, फोटो शेअर करतात. एकत्र उपवास - काही प्रेमिके उपवास एकत्र धरतात आणि चंद्र पाहिल्यावर नाते अधिक दृढ करण्याची प्रतिज्ञा करतात. बॉयफ्रेंड/गर्लफ्रेंड या दिवशी एकमेकांना खास भेटवस्तू व सरप्राईजेस देतात, ज्यामुळे हा दिवस संस्मरणीय ठरतो. पारंपरिक विधींची शाब्दिक नक्कल केली जाते, पण त्यामागे खरी भावना असते ती म्हणजे रोमँटिक अँगल एकमेकांवरील प्रेम आणि काळजी. सर्वांना करवा चौथ च्या हार्दिक शुभेच्छा.

## भरीव मदत..



आपत्तीग्रस्तांत्वरित
मदत होईलं भरीव
साचेबद्ध उत्तरे सारे
सदैव देती आखीव

लोभसवाणे वक्तव्य
भासते सुरेख रेखीव
विश्वास बसे सर्वस्वी
शब्द वापरले घोटीव

आलीआणली मदत
बातमी भरारे ऐकीव
सहाय्या कुणी न पुढे
सर्वा जरी वाटे कीव

कधी बांधता इमारत
कैकदा भरलीय नीव
अवघेआभाळ फुटले
टांगणीला लागे जीव

घडतनाही काही का
भावना असूनसजीव
उन्मळून पडली पिके
पडे निपचित निर्जीव

वर वरची मलम पट्टी
समस्या राहे आजीव
उग्ररूप धारेअडचणी
प्रयास करून अतीव

- हेमंत मुसरीक, पुणे
मो.९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ आरक्षण सोडत जाहीर




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर नगरपरिषदेच्या सन २०२५ - २६ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला) अनुसूचित जमाती (महिला) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व साधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्या करिता आज खादी व ग्रामोद्योग सभागृह, बंगला क्र.५ महाबळेश्वर येथे आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. नियंत्रक अधिकारी अभिषेक देशमुख साहेब यांच्या अध्यक्षतेखालील आरक्षण सोडत कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या उपस्थितीत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्या काढण्यात आल्या.

**एकूण १० प्रभागांमध्ये खालील प्रमाणे आरक्षण जाहीर झाले आहे. -**

प्रभाग क्रमांक १ अ)नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण), ब)सर्वसाधारण (महिला). प्रभाग क्रमांक २ अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण), ब)सर्वसाधारण (महिला). प्रभाग क्रमांक ३ अ) सर्वसाधारण महिला, ब) सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक ४ अ) अनुसूचित जाती (सर्वसाधारण), ब) सर्वसाधारण (महिला). प्रभाग क्रमांक ५ अ) सर्वसाधारण (महिला), ब) सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक ६ अनुसूचित जमाती (महिला), ब) सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक ७ अ)नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), ब) सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक ८ अ) अनुसूचित जाती (महिला), ब) सर्वसाधारण. प्रभाग क्रमांक ९ अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), ब) सर्वसाधारण प्रभाग क्रमांक १० अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), ब) सर्वसाधारण. ५० टक्के महिला आरक्षण असल्यामुळे महाबळेश्वर नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदा १० महिला नगरसेविका म्हणून संधी मिळणार आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर काही प्रभागांमध्ये इच्छुकांमध्ये कही खुशी कही गम अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यावेळी नगरपालिका मुख्यलिपिक आबा ढोबळे, अमित माने तसेच महाबळेश्वर नगरीतील माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका व विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार बांधव, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मरणानंतर सरणावर ही अंधार! मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची नामुष्की



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील नागणी रोड स्मशानभूमीत अंत्यविधीच्या ठिकाणी पथदिवेच नाहीत. त्यामुळे याठिकाणी अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांना चक्क गाडीच्या व मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची वेळ ओढावली आहे. दरम्यान, या स्मशानभूमीत पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी नागरिक आणि नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. या स्मशानभूमीकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. नुकत्याच निधन झालेल्या व्यक्तीवर या स्मशानभूमीत अंधारातच अंत्यसंस्कार करावे लागल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहरातील विविध समस्यांचा उद्रेक आता थेट स्मशानभूमी पर्यन्त पोहोचला आहे. रात्री अंत्यसंस्कार करताना चार चाकी वाहने उभे करून त्यांच्या हेडलाईटचा प्रकाशाचा आसरा मोबाईल टॉर्च घेण्याची वेळ मृतांच्या नातेवाईकावर आली आहे. पालिकेने या स्मशानभूमीत हायमास्ट दिवे त्वरित बसून देऊन तेथील योग्य ती साफसफाई करून नागरिकांची सोय करून द्यावी. परिणामी मृत्यू झाल्यानंतर स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या कुटुंबातील नागरिकांनी मोबाईल टॉर्च व गाडीच्या बॅटरीच्या उजेडात अंत्यविधी उरकावे लागत असल्याने अंत्यसंस्कारासाठी आलेले आप्तेष्ट, शहरवासी पालिकेच्या दुर्लक्षा बद्दल कमालीची हाताश भावना व्यक्त केली.

## विंचूर ग्रामपंचायत सदस्यांकडून दुहेरी निवेदन

### रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.०८, विंचूर (नाशिक) :** विंचूर शहर व परिसरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था पाहता नागरिकांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्य नाना जेऊघाले व राजेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली सदस्यांनी दोन स्वतंत्र निवेदनांद्वारेसार्वजनिक बांधकाम विभाग (निफाड) तसेच बी.अँड.सी विभाग (नाशिक) यांच्याकडे रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी केली आहे. पहिल्या निवेदनात विंचूर तीनपाटी सर्कल, श्रीराम चौक ते लासलगाव मार्गावरील मोठमोठे खड्डे तातडीने बुजविण्याची विनंती करण्यात आली आहे. या रस्त्यावर दररोज अपघातांच्या घटना घडत असून, धुळीचे साम्राज्य व वाहतुकीतील अडथळे नागरिकांसाठी मोठा त्रास बनले आहेत. विशेषतः संत जनार्दन स्वामी कुटीयासमोरील रस्ता अतिशय खराब स्थितीत असल्याने जीवघेणे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दुसऱ्या निवेदनातविंचूर श्रीराम चौक ते नाशिक - छत्रपती संभाजीनगर हायवेमार्गावरील खड्ड्यांची समस्या मांडण्यात आली आहे. सदस्यांनी नमूद केले आहे की, काही दिवसांपूर्वी खड्ड्यांमध्ये माती व खडी टाकण्यात आली होती; मात्र काही दिवसांतच ती उडून गेल्याने पुन्हा मोठे खड्डे निर्माण झाले आहेत.विंचूर हे मोठे कांदा मार्केट असल्याने या मार्गावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते, त्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. येत्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर या मार्गांवरील गर्दी लक्षात घेता रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, पसरलेली खडी हटवावी तसेच तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करून श्रीराम चौक 'धुळमुक्त' करावा, अशी मागणी सदस्यांनी केली आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब जेऊघाले, राजेंद्र मोरे, इम्रान मोमीन, दिलीप चव्हाण, फिरोज मोमीन, भाऊसाहेब साहनखोरे उपस्थित होते.

श्रीराम चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ साचल्यामुळे दुकानदार, राहिवासी आणि वाहनधारक त्रस्त झाले आहेत. काही दिवसांपूर्वी टाकलेला मुरूम आणि खडी आता उघडे पडले असून, अपघात वाढले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी दोन तास तिथे उभे राहून जनतेचा त्रास प्रत्यक्ष पाहावा. तातडीने डांबरीकरण न झाल्यास आम्हाला मोठ्या स्वरूपात आंदोलन करावे लागेल.

**राजेंद्र मोरे (ग्रामपंचायत सदस्य, विंचूर)**

## पंतप्रधान यांच्या हस्ते 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' कार्यक्रमाचे झाले ऑनलाईन उद्घाटन



### मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून कामगारांचा सन्मान

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०८, धाराशिव :** देशाला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाणारे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते मंगळवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले आहे. त्याचबरोबर एकाच वेळी राज्यातल्या ५६० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि तांत्रिक विद्यालयांमध्ये विश्वकर्मा कारागिरांच्या उपस्थितीत अत्याधुनिक आणि वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमांची सुरुवात झाली आहे अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. कामगार हा समाजाचा अविभाज्य घटक असून या घटकाचा सन्मान झाला पाहिजे. हा विचार आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदीजी यांनी दिला असून याच अनुषंगाने कामगारांचा सन्मान करण्यात येत असल्याचे मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले. एकीकडे प्रधानमंत्री मोदीजी यांच्या शुभहस्ते नवी मुंबईत 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' या महत्वकांक्षी उपक्रमाचे उदघाटन होत असतानाच राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये विश्वकर्मांच्या हस्ते अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यातील संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय आयटीआय या संस्थेत विश्वकर्मा पंडित दिगंबर शंकरराव यांच्या हस्ते ०४ अल्पमुदत अभ्यासक्रमाची सुरुवात केली आहे. यावेळी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, पालक उपस्थित राहिले असून या कार्यक्रमात विश्वकर्मा अर्थात कामगार वर्गाचा यथोचित सन्मान करण्यात आला आहे. सुदृढ आणि सौहार्दपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी कामगारांना सन्मानाचे स्थान मिळायला हवे प्रधानमंत्री मोदीजींचा हाच विचार आम्ही या निमित्ताने पुढे घेऊन जात असल्याचेही मंत्री लोढा यांनी नमूद केले आहे.वयाच संकल्पनेतून स्थानिक आयटीआयच्या या कार्यक्रमात कामगारांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून चालू वर्षात ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार असून, पुढील वर्षापासून ही संख्या १ लाख प्रशिक्षणार्थ्यांपर्यंत वाढविण्याचा संकल्प कौशल्य विभागाने केला आहे. प्रत्येक जिल्ह्यातील संस्था व्यवस्थापन समित्या (खचउ) स्थानिक पातळीवर हे अभ्यासक्रम चालविणार आहेत. त्यामुळे शिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी आणि गुणवत्ता नियंत्रण या सर्व बाबींमध्ये स्थानिक सहभाग व उत्तरदायित्व वाढणार आहे. या कार्यक्रमांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित अभ्यासक्रमांचा समावेश असून त्यात ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सोलर ऊर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ग्रीन हायड्रोजन, मोबाईल दुरुस्ती तंत्रज्ञ, सोशल मीडिया प्रभावक (इन्फ्लुएंसर) इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आला आहे. महिला उमेदवारांसाठी ३६४ विशेष बॅचेस तसेच उदयोन्मुख क्षेत्रांसाठी ४०८ विशेष बॅचेस सुरू करण्यात येणार आहेत. गडचिरोली, लातूर, नागपूर आणि अमरावती येथे स्थानिक उद्योग गरजांनुसार विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार असून नाशिक येथे होणारा कुंभमेळा लक्षात घेऊन वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट हा विशेष अभ्यासक्रमही राबविण्यात येईल. या अल्पमुदत अभ्यासक्रमांसाठी इच्छुक तरुणांनी अधिक माहितीसाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या https://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने केले आहे. सदरील कार्यक्रमासाठी स्थानिक विश्वकर्मा पंडित दिगंबर शंकरराव, आय एम सी सदस्य जी.बी. करडे महादेव अडसूळ, नवनाथ खोडसे, शिवाजी शिरसाट, ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश भडंगे, सामाजिक कार्यकर्ते किशोर वाघमारे, समाजसेवक मकरंद पाटील, प्राचार्य केशव पवार, गटनिदेशक शामकांत डोंगे, भांडारपाल बाजीराव राऊत, शिल्पनिदेशक हनुमंत केदार, बालाजी उदबुके, सुजित दंडनाईक, नितेश पडघान, तेजस गुटाळ, विश्वनाथ पाटील, धैर्यशील मडके, अक्षय सुतार, वसंत टोपे, नदीम शेख, शिल्पनिदेशिका गोदावरी वडजकर, कोमल मेंडके, वरिष्ठ लिपीक विलास सुरवसे, महेश सौलाखे, चतुर्थ श्रेणी कर्मचारी पप्पू मडके, रवींद्र जेटीथोर, फरजना शेख, सिद्धेश्वर मडके, समाधान सुरवसे आदींनी कार्यक्रम यशस्वी केला, सदरील कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी, पालक, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ विद्यालयाच्या मुली मैदानी स्पर्धेत अव्वल

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०८, खंडाळा (सातारा) :** लोणंद येथे झालेल्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये रयत इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये कु.मृण्मयी वैभव कट्टे या विद्यार्थिनीने उंचउडी क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत ती जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरली. तसेच कु.आदिती सागर जाधव हिने तिहेरी उडी या क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आणि जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरली.तसेच थाळीफेक क्रीडा प्रकारांमध्ये कु.ओवी सचिन घाडगे हिने तृतीय क्रमांक मिळवला व (४÷१०० रिले) या क्रीडा प्रकारांमध्ये तृत्रीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षाखालील मुलींमध्ये कु.वैभवी राजेंद्र वीर हिने तिहेरी उडी क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र झाली.तसेच कु.आर्या देवेंद्र शिंदे याविद्यार्थीनीने तिहेरी उडी प्रकारांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. १४ वर्षाखालील मुलांमध्ये श्रेयश मोहन वीर या विद्यार्थ्याने लांब उडी प्रकारांमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आणि तो जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. तसेच कु. अर्णव विठ्ठल खरात याने उंच उडी क्रीडा प्रकारामध्ये तृतीय क्रमांक पटकावला. १७ वर्षा खालील विद्यार्थ्यांमध्ये कु.साई विक्रम मिसाळ या विद्यार्थ्याने तिहेरी उडी क्रीडा प्रकारांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी खेळाडूंचे शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा



सागर मांढरे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, शिक्षक पालक संघाचे सर्व सदस्य, शाळेच्या पर्यवेक्षिका वासंती घाडगे, क्रीडा शिक्षक सुरज निवसे सर्व शिक्षक व पालक यांनी अभिनंदन केले.

## सेंट मायकल इंग्लिश स्कूलची मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर, चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मैदानी क्रीडा स्पर्धेत सेंट मायकल इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. १४ वर्षाखालील मुलांमध्ये ४०० मीटर व ६०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रोशन ठाकरे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. रौनक शर्मा या खेळाडूने थाळीमध्ये प्रथम व गोळा फेक मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच थाळी फेक मध्ये मुकुंद पोटदुखे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तर १४ वर्षाखालील मुलींच्या १०० मीटर धावणे व २०० मीटर धावणे यामध्ये कुमारी हिमानी गौरकार हिने द्वितीय क्रमांक मिळवून विभाग स्तरावर पोहचलेला आहे. १७ वर्षाखालील मुले व मुली यामध्ये पियुष मारबते यांनी २०० मीटर धावण्याच्या शर्यती द्वितीय क्रमांक मिळविला. कुमारी सारा जोसेफ हिने भालाफेक मध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभाग स्तरावर पोहोचलेले आहेत. १४ वर्षाखालील मुलींच्या रिले रेस मध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला, तर १७ वर्षाखालील मुलांच्या रिले रेस मध्ये सुद्धा




तृतीय क्रमांक मिळविला. २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत समर्पिता लाटेलवार हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. गोळा फेक मध्ये सार्थ वडस्कर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षाखालील व १७ वर्षे खालील मैदानी स्पर्धेत प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक प्राप्त खेळाडू विभाग स्तरावर पोहचल्यामुळे विजय खेळाडूंना, क्रीडा शिक्षकांना विद्यालयाचे प्राचार्य विकास कोल्हेकर, उपप्राचार्य सुधीर सिंग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून मैदानी स्पर्धेत विभाग स्तरावर उत्तम कामगिरी करण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

## मनसेच्या पारनेर तालुकाध्यक्ष पदी अविनाश पवार यांची नियुक्ती

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०८, सुपा (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी अविनाश मुरलीधर पवार यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तसेच पक्षाचे नेते बाळा नांदगावकर व माथाडी कामगार सेना अध्यक्ष सचिन गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अध्यक्ष सचिन डफळ यांच्या हस्ते ही नियुक्ती पार पडली. नवीन तालुकाध्यक्षपदी



निवड झाल्यानंतर बोलताना अविनाश पवार यांनी सांगितले की, पारनेर विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार उभे असतानाही काही माजी पदाधिकाऱ्यांनी पक्षविरोधी भूमिका घेतली होती. काहींनी आर्थिक चिरी-मिरी करून पक्षविरोधी मतदान केले. अशा पदाधिकाऱ्यांवर लवकरच शिस्तभंगाची कारवाई करून हकालपट्टी केली जाईल. पक्षाशी निष्ठा ठेवून काम करणाऱ्या नवीन कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल.

असे पवार यांनी पुढे सांगितले की, मनसेच्या कार्यसंघात नव्या ऊर्जेचा आणि निष्ठावान कार्यकर्त्यांचा समावेश करून पारनेर तालुक्यात पक्ष मजबूत करण्याचे उद्दिष्ट आहे. लवकरच गटनिहाय नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून प्रत्येक गावपातळीवर पक्ष संघटना मजबूत करुन सक्षम केली जाईल. सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर श्रद्धा ठेवून पारनेर तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बळ अधिक वाढवण्याचा निर्धार तालुका अध्यक्ष अविनाश पवार यांनी व्यक्त केला यावेळी महेंद्र गाडगे, विशाल गवळी, यांच्या सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवीन बिना बौद्ध विहारात वर्षावास समाप्ती

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** भानेगाव नवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ, शाखा नवीन बिना, भानेगांव यांच्या सयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात वर्षावास समाप्तीचा कार्यक्रम संपन्न झाला. सकाळी सिद्धार्थ शेंडे व इंदू शेंडे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करून भदंत बुद्धशील यांनी परित्राण पाठ घेतले. सायंकाळी मुख्य कार्यक्रमात कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती, मुख्य अतिथी व प्रमुख अतिथी आमदार डॉ.आशिष देशमुख गैरहजर असल्याने त्यांनी दिल्ली येथून पाठविलेल्या लिखित संदेशाचे त्यांचे प्रतिनिधी ओबीसी आघाडी नागपुर जिल्ह्याचे महासचिव विकास महल्ले यांनी पुढीलप्रमाणे वाचन केले. ‘वर्षावास कार्यक्रम समाजाला एकता प्रबोधन आणि नैतिक मूल्यांचा संदेश देणारा असून यातून आगामी पिढ्यांना सकारात्मक उर्जा, प्रेरणादायी वातावरण व मार्गदर्शन मिळेल’ कार्यक्रमाचे विशेष अतिथी श्यामराव सरोदे यांनी बुद्धाच्या मार्गावर मार्क्रमण करीत सर्वांनी देशात गुण्यागोविंदाने नांदावे असे मत मांडले. अतिथी सचिन नागरकर, सचिव भाजपा सावनेर तालुका यांनी समाजात एकता असल्यास आपण जग जिंकू शकतो असा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या अतिथी मिनाक्षी तागडे, सरपंच चिचोली-खापरखेडा यांनी वर्षावासाचे इतिहास व महत्व यावर प्रकाश टाकला. अतिथी अमोल कळंबे, सामाजिक कार्यकर्ते यांनी सर्व धर्म, पंथ, संप्रदाय यांनी प्रेमाचाच संदेश दिला असून पंचशीलाचा मार्ग मध्यम मार्ग आहे. ग्रामपंचायत भानेगावच्या सरपंच यांनी विहाराच्या विकासासाठी आम्ही सर्वोपरी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी बौद्ध धर्म विज्ञाननिष्ठ असून त्यातील प्रेम, आदर, सदाचार, समता व निष्ठा तत्व



असून भारतीय संविधाने सर्वांना राष्ट्रीय एकात्मतेच्या सूत्रात गुंफले आहे, असे मत व्यक्त केले. मीना नरेश ढोके, प्रमोद चव्हाण, तुळसा गौरकर, नंदा सोमकुंवर, वंदना गणवीर यांनी गीताच्या माध्यमातून आपले समतामूलक विचार धम्मपिठावर व्यक्त केले.

याप्रसंगी उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, हिशोब तपासणीस नरेश ढोके, सल्लागार समितीचे सदस्य लक्ष्मण लांजेवार, मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, भैयाजी सोनटक्के, अशोक कांबळे, अशोक नारनवरे, मिलिंद गौरकर, आनंद वासनिक, पृथ्वीराज गोलाईत, अजय ढोरे, ज्ञानेश्वर ढोके तसेच परिसरातील बाला-बालिका व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सामुहिक भोजनदानाणे करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन सारिका तागडे व आभार प्रिती गोलाईत यांनी मानले.

## थोडक्यात

### विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दुर रहावे - सतीश आदैलवार

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.०८, खंडाळा (सातारा) :** शिरवळ जिमखाना व शिरवळ पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त भारत अभियानांतर्गत सायकल रॅली व चित्रकला स्पर्धेचे आयोजन नुकतेच शिरवळ येथे करण्यात आले होते. यांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सतीश आदैलवार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना ते म्हणाले व्यसनापासून विद्यार्थ्यांनी दुर राहुन आयुष्याचे होणारे नुकसान टाळावे. शिरवळ जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे यांनी जिमखान्याच्या विविध उपक्रमांची माहीती देत विद्यार्थ्यांनी त्यांचा लाभ घ्यावा. शिरवळची ऐतिहासिक व औद्योगिक नगरी बरोबरच क्रीडानगरी अशी ओळख करण्यासाठी शिरवळ जिमखाना प्रयत्नशील राहील असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. सायकलिंग प्रभारी डॉ.राजेंद्र देशमुख यांनी सायकलिंगची माहीत देत विद्यार्थ्यांसाठी सायकल सहलीचे आयोजन करू असे सांगितले. जिमखाना सदस्य किरण पवार बोलत असताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्रीडाप्रकारात प्राविण्य मिळवून आपली वेगळी ओळख निर्माण करावी. क्रिडाशिक्षक पठाण यांनी शिरवळ जिमखान्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जिमखाना सदस्य अजय चौगुले व अमोल जरांडे याना कोल्हापूर येथील लोहपुरुष स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. उद्योजक राजकुमार शहा यांनी आभार मानले. कार्यक्रमास हर्ष मजोशी, अक्षय राऊत, पालक, शिक्षक विद्यार्थ्यी बहुसंख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या निव ‘महाराष्ट्र ऑलिंपिक’ च्या मतदार यादीवरच आक्षेप

## निवडणुकीमध्ये मनमानी कारभार - संदीप भोंडवे

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०८, मुंबई :** महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची निवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीमध्ये जाहीर करण्यात आलेली मतदार यादी चुकीच्या पद्धतीची आहे. अध्यक्षांनाच अंधारात ठेवून काही लोकांना घुसवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी केला आहे.

भोंडवे म्हणाले, या मतदार यादीत महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचा न्यायालयात वाद सुरू असून, त्यामध्ये न्यायालयाने सर्व कामकाजाला स्थगिती दिली आहे. तसेच, न्यायालयाने कबड्डी संघटनेवर प्रशासक नेमला आहे. प्रशासकास येत्या आठ दिवसात कामकाजाची सर्व सुत्रे द्यावीत, असे न्यायालयाने म्हटलेले असताना जे मतदान घेतले गेलेले आहे, ते चुकीच्या पद्धतीने घेतले गेलेले आहेत. जलतरण संघटनेबाबतही राष्ट्रीय संघटनेकडून अस्थायी समिती नेमली असून, संघटनेकडून दोन व्यक्तींची नेमणूक केली आहे. असे असतानाही त्या दोन व्यक्तींची नावे न घेता तिथे रिक्त जागा ठेवली असल्याने जलतरण संघटनेचे मतदान घेतलेले नाही. हॅण्डबॉल संघटनेमध्ये मुळ संघटनेचे प्रतिनिधी न घेता नामदेव शिरगावकर यांनी स्वतःच्या मर्जीतील प्रतिनिधी निवडणुकीसाठी घेतले आहेत. या सोबत तायक्कांदोच्या कोणत्याही संघटनेस भारतीय ऑलिंपिक असोसिएशनची मान्यता नसताना त्यांचे मतदान प्रतिनिधी घेण्यात आले आहेत, तर कराटे खेळास भारतीय ऑलिंपिक असोसिएशनची मान्यता नाही म्हणून मतदानाचे अधिकार डावलण्यात आलेले आहेत.

> महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची निवडणुकीचे कामकाज चुकीच्या पद्धतीने चालू आहे. यामुळे क्रीडा संघटनांना आंदोलन करण्याची वेळ आली. आता, तायक्कांदो संघटनेबाबत ‘एमओए’ कडे सर्व कागदपत्रे देऊन रितसर तक्रार आमच्या संघटनेने दाखल केली आहे.तरी,त्याचे आम्हाला अद्याप कोणतेही लेखी उत्तर आलेले नाही. त्यामुळे पुन्हा ०४ ऑक्टोबर ला विचारणा केली. तरीही उत्तर न मिळाल्याने आम्ही मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.
>
> **– मिलिंद पठारे,**
> **शिवछत्रपती पुरस्कार विजेते**
> **महासचिव, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई**

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार -**

गेल्या अनेक वर्षांपासून बॅडमिंटन खेळात कार्यरत, तसेच राज्याचा जीवनगौरव पुरस्कार प्रदीप गंधे यांचे नाव कियांग खेळातून मतदार दाखविण्यात आले आहे. वास्तविक या खेळाशी त्यांचा काहीही संबंध नसतानाही केवळ स्वतःच्या मतासाठी असोसिएशनचे सरचिटणीसांनी अशा व्यक्तींना यादीमध्ये मतदार म्हणून घेतले आहे. या मतदार यादीबाबत असोसिएशनचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अंधारात ठेवले असण्याची शक्यता असून, ही यादीच चुकीची आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणार असून, निर्णय न झाल्यास न्यायालयीन याचिका दाखल करू, असा इशारा ही भोंडवे यांनी दिला आहे.

### तेलंगणा एक्सप्रेसच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०८, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील एक इसम खासगी दवाखान्यात उपचारासाठी रेल्वे मार्ग ओलांडून जात होता. दरम्यान बल्लारपूर कडून तेलंगणा एक्सप्रेस आली. रेल्वे येताना त्याच्या लक्षात आले नाही. परिणामी त्याचा रेल्वेच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता विसापूर रेल्वे स्थानक जवळ घडली. रेल्वे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव मोहनमुरारी अर्जून कोडापे (६४) रा. विसापूर ता.बल्लारपूर असे आहे. मोहनमुरारी हे घरून टेकडी भागातील एका खासगी दवाखान्यात उपचारासाठी जातो म्हणून बाहेर पडला. विसापूर गावाच्या माध्यमातून तीन रेल्वे मार्ग गेले आहेत. तो रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वे मार्ग ओलांडून जात होता. नेमक्या त्याच वेळी बल्लारपूर कडून तेलंगणा एक्सप्रेस धडधड करत आली. ध्यानीमनी नसताना मोहनमुरारी ला रेल्वेची जबरदस्त धडक बसली. यामध्ये त्याच्या शरिराच्या चिंधड्या झाल्या. घटनेची माहिती होताच रेल्वे पोलीस व विसापूर चौकी चे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी त्याचा मृतदेह बल्लारपूर येथे ग्रामीण रुग्णालय हलविण्यात आला. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. घटनेचा पुढील तपास रेल्वे पोलीस निरीक्षक पि.व्ही.शुक्ला, पि.के.यादव, विसापूर चौकीचे दीपक खरतडे, विजय मेंढे करत आहे.

# घातक कफ सिरपवर वर तातडीने बंदी आणा, मुलांच्या जीवाशी खेळ थांबवा - प्रशांत कांबळे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पुणे :** उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये Sresan Pharmaceuticals (चेन्नई) निर्मित Coldrif कफ सिरप मुळे १८ मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तपासात या सिरपमध्ये घातक Diethylene Glycol (DEG) असल्याचे आढळले आहे. अशा औषधांचा पुरवठा पुणे शहर, पुणे जिल्यात तसेच महाराष्ट्रात देखील होऊ नये म्हणून आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे सामाजिक न्याय विभाग यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की Coldrif कफ सिरप व डअॅशीरप झहरऑर उत्पादने महाराष्ट्रात, पुण्यामध्ये तातडीने बंदी घालावी.



पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व कप सिरप कंपन्यांचे स्टॉक जप्त करून तपासणीसाठी पाठवावेत. औषध नियंत्रक विभागाने जनजागृती मोहीम राबवून पालकांना सावध करावे. तसेच इतरही औषध कंपन्यांचे सिरप नमुने तपासून दोष आढळल्यास कठोर फौजदारी कारवाई करावी. मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना शिक्षा हवी, संरक्षण नाही! तातडीने यावरती सरकारने तसेच अन्न औषध प्रशासन आणि वैद्यकीय




अधिकारी पोलीस प्रशासन यांनी संयुक्तपणे तातडीने यंत्रणा राबवणे अत्यंत गरजेचे आहे. हा सर्व प्रकार जीवाशी असल्यामुळे जरी महाराष्ट्र बाहेर घडला असला देखील अशा कंपन्या पुणे शहर महाराष्ट्र मध्ये असल्याचे टाळता येणार नाही. नाहीतर सरकारी काम आणि सहा महिने थांब अशा उपाययोजना जीवाशी नकोय. कारवाईचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आलेले आहे. अशी माहिती प्रशांत कांबळे यांनी दिली आहे.

### मुदखेडच्या महादेव मंदिरात दानपेटी चोरताना चोरटासी.सी.टिव्हीत कैद

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील महादेव गल्लीतील महादेव मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली असल्याची घटना सी.सी.टी.व्ही कॅमेरात कैद झाली. चोराने ७ ऑक्टोंबर मंगळवारी रात्री साडे दहा च्या सुमारास दानपेटी व इतर वस्तू ची चोरी करतांना छाया चित्रात स्पष्ट दिसत असून दान पेटी मंदिराच्या बाहेर घेऊन जात असतांनाचा व्हिडीओ सोशल मिडीया वर व्हायरल झाला आहे. तोंडाला रुमाल पायात स्पोर्ट शुज घातलेल्या आणि पाठीवर स्कुल बॅग ही चोरलेल्या इतर वस्तू व रोकड ठेवण्यासाठी वरती असल्याचे सी.सी.टी.व्ही फुटेज मध्ये दिसत आहे. अज्ञान चोरट्याने मंदिरातील देवाचा गल्ला चोरी केला. ती वेळ रात्री साडे दहा दरम्याची असल्याने याचोरी बदल अनेक प्रश्न उपस्थीत होत आहेत. कारण या मंदिराच्या ओट्यावर रात्री साडे आकरा पर्यत परिसरातील व मंदिरा शेजारील तरुण व पुरुष असतात. या महादेव मंदिरात दररोज सकाळी ४ ते ५ या दरम्यान बाबुराव शंकरराव पांचाळ हे साफ सफाई सह अभिषेक पूजा हा नित्य दिनचर्या असते त्यांच्या निदर्शनास सदरील घटना प्रथम दर्शनी लक्षात आली. त्यांनी गल्लीतील इतरांना या घटनेचा तपशील लक्षात आणून दिला. या संदर्भात मुदखेड पोलीसांनी घटना स्थळाचा पंचनामा करूनसी.सी.टी.व्ही फुटेच्या आधारे पुढील तपास चालू आहे.

# डहाणू-कासा-जव्हार राज्य महामार्गाची दयनीय अवस्था

## खड्ड्यांमुळे अपघातात ४ जण जखमी !

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, डहाणू (पालघर) :** डहाणू-कासा-जव्हार या राज्य महामार्गाची सध्या अक्षरशः चाळण झाली असून, रस्त्यावर सर्वत्र खोल खड्ड्यांनी थैमान घातले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे.

दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास चारोटी आणि कासा दरम्यान या खड्ड्यांमध्ये बाईक आदळून झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील ४ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सारणी येथील एक दांपत्य आपल्या दोन चिमुकल्या मुलींना घेऊन कासा येथे घरगुती साहित्य खरेदीसाठी आले होते. मात्र, चारोटी-कासा मार्गावरील खोल खड्ड्यांमध्ये दुचाकी गेल्याने बाईकवरील चार ही जण रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीररीत्या जखमी झाले. जखमींना तातडीने कासा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले असून सुदैवाने सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

या अपघातात दोन लहान मुलींचा समावेश असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने त्या वेळी महामार्गावर जास्त वर्दळ नसल्याने मोठा अनर्थ टळला. तथापि, हा प्रकार रस्त्यांच्या अतिदयनीय अवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे पुन्हा अधोरेखित करतो. डहाणू-कासा-जव्हार राज्य महामार्ग हा पालघर जिल्ह्यातील एक महत्त्वाचा मार्ग असून दररोज हजारो नागरिक या मार्गावरून प्रवास करतात. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पावसाळ्यानंतर या रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, वाहन चालवताना चालकांना अक्षरशः जीव मुठीत धरावा लागतो. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, दरवर्षी पावसाळ्यानंतर या रस्त्याची हीच अवस्था होते. फक्त खड्डे बुजवण्याचे काम कागदावर केले जाते, प्रत्यक्षात मात्र डांबरीकरणाचे नावही नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. या दयनीय परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, लवकरात लवकर रस्त्याची दुरुस्ती न केल्यास आंदोलनाचा इशारा स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

### ९३ वा ईंडियन एअर फोर्स डे साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०८, मुंबई :** नेव्ही नगर कुलाबा या ठिकाणी ३ महाराष्ट्र बटालियन आर्मी युनिटच्या वतीने कर्नल डी.एस.सयाना यांच्या मार्गदर्शनाखाली इंडियन एअर फोर्स दिवसानिमित्त सराव करून करून घेण्यात आला. या फायरिंग सरावासाठी विविध शाळा कॉलेजमधील कॅडेट सहभागी झाले होते. यात गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला येथील स्वराज इंगळे, ऋग्वेद डिंगणकर यांची निवड झाली. निवडी बद्दल शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मुख्याध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सदर कॅडेट यांना मार्गदर्शन तीन महाराष्ट्र बटालियन ऑफिसर्स व शाळेचे शिक्षक व एनसीसी ऑफिसर विश्वनाथ पांचाळ यांनी केले होते. दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी इंडियन एअर फोर्स चा ९३ वा स्थापना दिवस होता.